महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र कमांक / नाविमं / पमा / 3886
दिनांक : 06 / 12 / 2023

प्रति,

सर्व प्राचार्य, / मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त विद्यालये,
नागपूर विभाग नागपूर.

**विषयः– माध्यमिक शालांत (इ.10वी) प्रमाणपत्र परीक्षा मार्च 2024 मध्ये प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या याद्या व परीक्षा शुल्काचे चलनासह प्रि–लिस्ट जमा करणे तसेच जुलै 2023 चे प्रमाणपत्र वाटप करण्याच्या तारखाबाबत.**

संदर्भः– (1) राज्य मंडळ पत्र क.रा.मं. / परीक्षा–3 / 5077, दि. 20 / 11 / 2023.
(2) पत्र कमांक / ना.वि.म. / प.मा. / 3687, दि. 20 / 11 / 2023.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्राचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत (इ.10वी) प्रमाणपत्र परीक्षा मार्च 2024 च्या परीक्षेसाठी आपले विद्यालयामार्फत आवेदनपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क RTGS/NEFT द्वारे भरणा केल्याची पावती, चलनासह याद्या व प्रिलिस्ट तसेच जुलै 2023 चे प्रमाणपत्र खालील जिल्हा संकलन केंद्रावर बुधवार दि. 13 / 12 / 2023 रोजी सकाळी 11.00 ते 5.00 या वेळेत वितरण व स्विकारण्यात येणार आहे.

तसेच राज्य मंडळाचे संदर्भिय पत्रानुसार इ. 10 वी च्या 2024 परीक्षेसाठी सादर केलेल आवेदन पत्र संदर्भात विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्र, याद्या व प्रि–लिस्ट तसेच परीक्षा शुल्काचे चलनासोबत (1) श्रेणी सुधार विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांची छायाप्रत (2) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांची छायाप्रत (3) तुरळक विषयास प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांची छायाप्रत (4) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वैद्यकिय प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत सादर करणे अनिवार्य आहे.

प्रि–लिस्टमध्ये विद्यार्थ्यांचे नाव, जन्मतारीख, जन्मस्थळ, लिंग, तसेच विषय व माध्यम इत्यादीमध्ये दुरूस्ती असल्यास स्वतंत्र पाकीटामध्ये देण्यात याव्यात.

तरी आपण किंवा आपले प्रतिनिधीमार्फत सदर याद्या व चलन खालील जिल्हा संकलन केंद्रावर मंडळाचे प्रतिनिधीकडे सादर करण्यात याव्यात.

| अ.क. | जिल्हा | जिल्हा वितरण केंद्राचे नांव |
|---|---|---|
| 01 | भंडारा | लालबहादूर शास्त्री हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, भंडारा. |
| 02 | साकोली | नंदलाल पाटिल कापगते विद्यालय, साकोली. जि. भंडारा. |
| 03 | चंद्रपूर | हिंदी सिटी हायस्कूल आझाद गार्डन जवळ, चंद्रपूर. |
| 04 | नागभिड | जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,नागभिड. जि. चंद्रपूर. |
| 05 | वर्धा | न्यु.इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, वर्धा. |
| 06 | गडचिरोली | श्री.शिवाजी हायस्कूल व क. महा. गोकूल नगर जि. गडचिरोली. |
| 07 | आलापल्ली | धर्मराव विद्यालय आलापल्ली जि. गडचिरोली. |
| 08 | आरमोरी | हितकारणी विद्यालय आरमोरी जि. गडचिरोली. |
| 09 | गोंदिया | गुजराथी नॅशनल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, गोंदिया. |
| 10 | नागपूर शहर | नागपूर विभागीय शिक्षण मंडळ कार्यालय,नागपूर. |
| 11 | नागपूर ग्रामिण | नागपूर विभागीय शिक्षण मंडळ कार्यालय,नागपूर. |

(बी. आर. रोकडे)
प्र. विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

प्रतिलिपि–

1) शिक्षणाधिकारी(माध्य.),जिल्हापरिषद, नागपूर / चंद्रपूर / भंडारा / गोंदिया / वर्धा / गडचिरोली.
2) मुख्याध्यापक,सर्व वितरण केंद्र, यांनी उपरोक्त दिनांकास साहित्य स्विकारण्याबाबत योग्य व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात यावी.